पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

फुलंब्री, ता. फुलंब्री, जि.औरंगाबाद

## क्रीडा विभाग (वार्षिक अहवाल)

### शैक्षणिक वर्ष २०१९-२०२०

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० क्रीडा विभागाचा अहवाल पुढील प्रमाणे

### आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा सहभाग

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये महाविद्यालयातील क्रीडा विभागाच्या वतीने क्रीडा प्रकाराची फिस रूपये ५००/— भरलेली होती. १६ क्रीडा प्रकारात एकूण ११० विद्यार्थ्यी सहभागी झाले.

| अ.क्र | क्रीडा प्रकार | सहभागी मुले | सहभागी मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | कबड्डी | 12 | – | 12 |
| 2 | बॉक्सींग | 6 | 3 | 9 |
| 3 | क्रिकेट | 1 | – | 1 |
| 4 | तायकॉन्दो | 2 | - | 2 |
| 5 | मैदानी स्पर्धा | 8 | 8 | 16 |
| 6 | क्रॉस कन्ट्री | 6 | 4 | 10 |
| 7 | बॉल बॅडमिंटन | 5 | – | 5 |
| 8 | आर्चरी | 3 | - | 3 |
| 9 | तलवारबाजी | 3 | 2 | 5 |
| 10 | कुस्ती | 4 | 3 | 7 |
| 11 | पावर लिफ्टींग, वेट लिफ्टींग | 3 | – | 3 |
| 12 | हॉकी | 14 | - | 14 |
| 13 | लॉन टेनिस | 5 | – | 5 |
| 14 | सॉफ्टबॉल | 13 | – | 13 |
| 15 | योगा | - | 3 | 3 |
| 16 | जुडो | 1 | 1 | 2 |
|  | एकूण | **86** | **24** | **110** |

### दैनंदिन खेळाचे तास व स्पर्धा प्रशिक्षण शिबीर

विद्यार्थ्यांनी मोकळा वेळ योग्य पध्दतीने वापरावा व सर्व विद्यार्थ्यांना विभागात उपलब्ध असलेल्या क्रीडा साहित्याचा लाभ घेता यावा साठी वेळापत्रकातच खेळांच्या तासाचे नियोजन केले गेले. त्यानुसान बी.ए. प्रथम, व्दितीय व तृतीय व बी.कॉम. प्रथम, व्दितीय व तृतीय तसेच बीएस.सी. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे दैनंदिन खेळाचे तास दुपारी ३.३० नंतर नियोजनात घेतले

गेले. विभागातील क्रीडा साहित्याचा योग्य तो वापर विद्यार्थ्यांनी यादम्यान करुन घेतला खेळाच्या तसांना विद्यार्थ्यांनी खालील खेळ खेळले गेले. तसेच स्पर्धा कालावधी मध्ये विद्यार्थ्यांना सकाळी ७.०० ते ९.०० व सायंकाळी ४.०० ते ६.०० या वेळेत महाविद्यालयात व विभागीया क्रीडा संकूल औरंगाबाद येथे विभागामार्फत प्रशिक्षण दिले गेले.

१. चेस २. टेबल टेनिस ३. कबड्डी ४. व्हॉलीबॉल ५. क्रिकेट ६. धनुर्विद्या

७. तलवारबाजी ८. बॉक्सींग ९. हॉकी १०. सॉप्टबॉल ११. हॅण्डबॉल

१२. ॲथलेटिक्स ११. थ्रो बॉल

## आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड चाचणी

वर्षाच्या सुरवातीलाच आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी विभागप्रमुखाकडे नावे नोंदवली. काही खेळांसाठी कमाल सहभाग संख्येपेक्षा जास्त विद्यार्थ्यानी नावे नोंदवली त्यानुसार उत्तोमोत्तम, अधिक होतकरु व नियमित खेळाडूंना संधी मिळावी हा हेतू समोर ठेवून काही खेळांसाठी निवड चाचणी घ्यावी लागली. निवड चाचणीसाठी विद्यार्थ्यांनी खालील निकर्ष लावले गेले.

अवलंब केलेले निकर्ष –

१. शारीरिक क्षमता चाचणी

२. कौशल्य चाचणी

३. मैदानावरील दैनंदिन उपस्थिती व वर्तन

**खेळ निहाय विद्यार्थ्यी संख्या**

१. धनुर्विदया – ६ २. वेटलिप्टींग – ६ ३. ॲथलेटिक्स – १०० मी. – ८

४. २०० मी. – ४ ५. गोळा फेक – २ ६. थाळी फेक – २ ७. भाला फेक – १

८. क्रॉस कंन्टी – १० ९. टेबल टेनिस – ५ १०. क्रिकेट – १२ ११. कबड्डी – १२

१२. चेस – ४ १३. तलवारबाजी – १० १४. बॉक्सींग – ६ १५. हॉकी – ३२

१६. सॉप्टबॉल – १५

## महाविद्यालय अंतर्गत क्रीडा स्पर्धा

महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक क्रीडा प्रकारांचा अनुभव घेता यावा तसेच उदयोन्मुख खेळाडूंना आधिक प्रेरणा मिळावी या हेतूने महाविद्यालयात विविध दिवसांचे औचित्य साधून क्रीडा स्पर्धाचे आयोजन केले गेले. वर्षभर खालील प्रमाणे खेळांचे आयोजन केले गेले.

१. क्रीडा दिन – २९ ऑगस्ट – चेस व टेबल टेनिस – सहभागी खेळाडू – १७ मुले, ९ मुली

२. वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन – ३२ मुले व ४५ मुलींचा सहभाग

## क्रीडा विभागातर्फे आयोजीत विविध उपक्रम

**आंतरराष्टीय योगा दिवस – २१ जुन २०१९** रोजी क्रीडा विभागाच्या वतीने आंरराष्टीय योगा दिवस साजरा करण्यात आला. या मध्ये क्रीडा विभाग प्रमुख डॉ. संदीप जगताप यांनी प्रात्यक्षिके सादर केली.

**मॅराथॉन स्पर्धा – २४ ऑगस्ट २०१९** रोजी क्रीडा विभागाच्या वतीने मा. नामदार विधानसभा अध्यक्ष श्री. हरीभाउ बागडे नाना यांच्या वाढदिवसानिमित्य दिनांक १७ ऐवजी २४ ऑगस्ट २०१९ रोजी भव्य मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये २,३,५ किलोमीटर अंतरामध्ये सुमारे १२४८ खेळाडूंनी सहभाग नोदविला. स्पर्धेचे उद्घाटन नगर अध्यक्ष श्री. सुहासभाउ सिरसाठ यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी मा. नामदार हरिभाउ बागडे नाना, अनुराधा ताई चव्हाण, संस्थेचे सचिव श्री. शामसुंदर नाईक, आंतरराष्टीय पंच संजिवणी दिल्लीकर, विद्यापीठ अधिसभा सदस्य डॉ. फुलचंद सलामपुरे, शिव छत्रपती पुरस्कार विजेते डॉ. उदय डोंगरे, डॉ. राम जाधव, सभापती सर्जेराव मेटे, नरेद्र देशमुख, नितीनजी बोंदरे, प्राचार्य डॉ. एस.आर. टकले, डॉ. संदीप जगताप आदींची उपस्थीती होती.

**तालुकास्तरीय स्पर्धा –** शैक्षणिक वर्ष २०१९ – २० मध्ये महाविद्यालयाच्या क्रीडा विभागातर्फे २ तालुका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये सुमारे १४० खेळाडूंनी सहभाग नोदविला.

**अतिथी व्याख्यान –** शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने २९ ऑगस्ट राष्टीय क्रीडा दिनी अतिथी व्याख्यान घेण्यात आले यामध्ये डॉ. राम जाधव, क्रीडा संचालक, पार्थी महाविद्यालय व डॉ. सुभाष काळे यांनी मार्गदर्शन केले.

## आंतरविद्यापीठ, राष्टीय व राज्य स्पर्धेतील सहभाग

**आंतरविद्यापीठ प्रशिक्षण शिबीर –** महाविद्यालयातील १४ खेळाडूंनी ऑल इंडिया आंतरविद्यापीठ प्रशिक्षण शिबीरासाठी निवड करण्यात आली.

**आंतरविद्यापीठ सहभाग –** महाविद्यालयातील १२ खेळाडूंनी आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभाग नोंदविला.

**खेळो इंडिया –** पहील्या खेलो इंडिया स्पर्धेमध्ये २ खेळाडूंनी सहभाग नोंदविला

**राष्टीय स्पर्धा –** महाविद्यालयातील २ खेळाडूंनी संघटनेच्या राष्टीय स्पर्धेत महाराष्टाचे प्रतिनिधीत्व करुन सहभाग नोंदविला.

**राज्य स्पर्धा –** महाविद्यालयातील १० खेळाडूंनी राज्य स्पर्धेत सहभाग नोंदविला

**आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेमध्ये मिळविलेले पदक –** विविध स्पर्धेमध्ये ४ सुवर्ण, ५ रौप्य व १ कास्य पदक